# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०१५

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या – ५०**

**शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांवर होणा-या अन्यायाची दखल घेण्याबाबत**

(१) **११०९** (२१-१-२०१५). **श्री. अनिल सोले, श्री. नागो गाणार** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांवर होणा-या अन्यायाची दखल घेण्याबाबत दिनांक १९ जुलै, २०१३ रोजी नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी शासनास पत्र पाठवून उचित कार्यवाही करण्याची मागणी केली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (६-१०-२०१५) : (१) शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांवर झालेल्या अन्यायाची दखल घेण्याबाबतचे नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींचे दि. १९ जुलै, २०१३ चे पत्र तसेच तक्रार आढळून आली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती विभागातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत**

(२) **१५६६** (२१-१-२०१५). **श्री. श्रीकांत देशपांडे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) अमरावती विभागातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या मोठ्या प्रमाणात मागण्या प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय ;

(२) सदर मागण्यांपैकी कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत ;

(३) तसेच उर्वरित मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (६-१०-२०१५) : (१) अमरावती विभागातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या मागण्या मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत, हे खरे नाही.

(२) व (३) शिक्षक/शिक्षकेत्तर संघटनांच्या नियतकालिक बैठका क्षेत्रीय स्तरावर आयोजित करुन मागण्यांचे अनुषंगाने कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करण्यात आली आहे. उर्वरित धोरणात्मक मागण्यासंदर्भात संघटनांबरोबर राज्यस्तरावर वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात येऊन संघटनेच्या प्रश्नावर चर्चा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) च्या सवलती मिळणेबाबत**

(३) **१९१७** (२९-१-२०१५). **श्री. रामराव वडकुते** : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) महाराष्ट्र राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या (Scheduled Tribes) च्या सवलती देण्याबाबत धनगर आरक्षण कृती समिती पुणेचे अध्यक्ष व कार्यकर्ते यांनी केलेले आंदोलन व उपोषण दिनांक २९ जुलै, २०१४ ला सोडण्याचे दिवशी मा.मुख्यमंत्री यांनी पाहिल्याच मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊ असे स्पष्ट आश्वासन कृती समितीस दिलेले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महाराष्ट्र शासनाने अंतिम निर्णय घेतलेला आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, सदरहू निर्णय केव्हा घेण्यात आलेला आहे ;

(४) असल्यास, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केलेली आहे वा करण्यात आलेली आहे ?

**श्री. विष्णू सवरा** (१०-९-२०१५) : (१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य धनगर समाजोन्नती मंडळ (रजि.), मुंबई यांचे दिनांक १५ डिसेंबर, २०१४ च्या निवेदनावरुन दिसून येते.

(२), (३) व (४) धनगर जातीचा मे, १९९० पूर्वी इतर मागासवर्गीयांच्या यादीत समावेश होता. मे, १९९० पासून भटक्या जमाती "क" मध्ये धनगर जातीचा तिच्या उप/तत्सम जातीसह समावेश करुन ३.५ टक्के इतके आरक्षणाचा लाभ शासकीय नोकरी, शैक्षणिक संस्थेमधील प्रवेश यासाठी अनुज्ञेय करण्यात आला आहे. तसेच या जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, आश्रमशाळा, वसतीगृहाच्या सवलती इ. लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत.

धनगर समाजाला अनुसूचित जमातीत समावेश करण्याबाबतची बाब आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून तपासण्यात येत आहे.

---

**राज्यातील विविध १८ जिल्ह्यातील मागासवर्गीय वसतिगृहाची झालेली दुरावस्था**

(४) **२०९३** (२७-१-२०१५). **श्री. सुनिल तटकरे, श्री. हेमंत टकले, श्री. किरण पावसकर** : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्यातील विविध १८ जिल्ह्यातील मागासवर्गीय वसतिगृहाची दुरावस्था झाल्याचे माहे जून, २०१४ च्या तिस-या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उक्त शासकीय मागासवर्गीय वसतिगृहाची दुरावस्था सुधारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले** (२३-९-२०१५) : (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे नेफ्रॉलॉजी विभागात कार्यरत एम.डी. (मेडीसीन) पदवीधरांना पोस्ट ग्रॅज्युएट भत्ता देण्याबाबत**

(५) **२६९८** (२०-४-२०१५). **श्री. अनिल सोले, श्री. नागो गाणार, श्री. मितेश भांगडिया** : सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे नेफ्रॉलॉजी विभागात एम.डी. (मेडीसीन) हे पदवीधर मागील १० वर्षांपासून कार्यरत आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्यांना पी. जी. अलाऊन्स देण्याबाबत शासनातर्फे प्रस्तावित आहे काय ;

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ;

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (२८-९-२०१५) : (१) होय.

(२) संस्था स्तरावर पी.जी. अलाऊन्स देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) पदव्युत्तर अर्हताधारकांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर दरमहा रुपये २५०० पदव्युत्तर भत्ता पी.जी. अलाऊन्स अनुज्ञेय राहील.

(४) संस्था स्तरावर कार्यवाही सुरु आहे,

---

**परभणी जिल्ह्यातील शासकीय कार्यालयातील प्रकरणे विहित मुदतीत निकाली काढण्याबाबत**

(६) **२७८२** (१०-४-२०१५). **श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री. सतिश चव्हाण, श्री. अमरसिंह पंडित, श्री. विक्रम काळे** : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) परभणी जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयात देण्यात आलेले अर्ज शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ (२००६ चा महाराष्ट्र २१) च्या नियमाप्रमाणे विहित मुदतीत निकाली काढण्यात येत नसल्याने जनतेस त्या कायद्यान्वये लाभ मिळत नसल्याबाबतची तक्रार येथील पत्रकारांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे सन २०१५ च्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, वरील अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत प्रकरणे अंतिम निकालात काढणे व जनतेस न्याय मिळवून देण्याबाबत दिरंगाई करणा-या संबंधित दोषी यंत्रणेची चौकशी करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे तसेच त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याबाबतचे आदेश मा. विभागीय आयुक्त यांच्या स्तरावरुन देण्यात आले आहेत, हेही खरे आहे काय ;

(३) नसल्यास, त्यांना पाठीशी घालण्याचे धोरण वरिष्ठ स्तरावरुन राबविण्यात येत आहे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे** (२९-०७-२०१५) : (१) पत्रकाराचे अशा आशयाचे निवेदन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत**

(७) **४०५२** (२०-४-२०१५). **श्री. पांडुरंग फुंडकर** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) IDMI योजनेअंतर्गत राजा एज्युकेशन ॲन्ड बहुउद्देशिय सोसायटी, पिंपळगाव राजा, ता. खामगाव, जिल्हा बुलढाणा या संस्थेला पायाभूत सुविधेसाठी थकित असलेले अनुदान वितरीत करणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा. अल्पसंख्यांक विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २२ डिसेंबर २०१४ रोजी पत्राद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी राजा एज्युकेशन सोसायटी व इतर ४ संस्थेस पायाभुत सुविधा उपलब्ध करण्यासाठी अनुदानाचा दुसरा हप्ता मिळण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण, पुणे यांच्याकडे दिनांक १६ ऑक्टोबर २०१४ रोजी पाठविला आहे, हे खरे आहे काय ;

(३) असल्यास, राजा एज्युकेशन सोसायटी वगळता इतर ४ संस्थेस अनुदानाचा दुसरा हप्ता वितरीत करण्यात आला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राजा एज्युकेशन ॲन्ड बहुउद्देशिय सोसायटी, पिंपळगाव राजा, ता. खामगाव या संस्थेस शाळेच्या पायाभूत सुविधांच्या कामासाठी दुसरा हप्ता वितरीत न करण्याची कारणे काय ;

(५) सदर अनुदान वितरीत करणेबाबत संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण यांना आदेश दिले वा देण्यात येणार आहेत काय ?

**श्री. विनोद तावडे** (२८-८-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय.

(४) व (५) राजा एज्युकेशन ॲन्ड बहुउद्देशीय संस्था, पिंपळगाव राजा, ता. खामगाव, जि. बुलढाणा या संस्थेच्या पहिल्या हप्त्याच्या अनुदान वितरणानंतर सदर संस्थेविरुद्ध प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (नि.शि.), बुलढाणा व कार्यकारी अभियंता, सर्व शिक्षा अभियान, जि.प. बुलढाणा यांना चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये विसंगती आढळून आल्यामुळे संबंधित संस्थेस अनुदान वितरीत करता आले नाही. याबाबत चौकशी करण्यात येत असून चौकशी अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**राज्यात शेतीमालाला हमी भाव देण्याबाबतचे शासनाचे धोरण काय**

(८) **४४९०** (१७-४-२०१५). **डॉ. सुधीर तांबे, श्री. संजय दत्त, श्री. विक्रम काळे, श्री. सतिश चव्हाण** : सन्माननीय कृषि मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्यात शेतीमालाला हमी भाव देण्याबाबतचे शासनाचे धोरण काय आहेत ;

(२) हमी भाव ठरविण्यासाठी केलेल्या उपाययोजना कोणत्या आहेत ;

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (७-७-२०१५) : (१) व (२) किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितीतील आहे. प्रत्येक वर्षी पीक उत्पादन खर्च योजनेंतर्गत खरीप, रब्बी व ऊस हंगामासाठी चारही कृषि विद्यापीठांकडून पीक उत्पादन खर्चाच्या प्राप्त होणा-या माहितीच्या आधारे व विविध निविष्ठांची प्रचलित भावपातळी लक्षात घेवून उत्पादन खर्चावर आधारित किंमती, केंद्रिय कृषि मूल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित करण्यात येतात.

केंद्रिय कृषि मूल्य व किंमत आयोगाकडून ही किंमत निर्धारीत करतांना विविध राज्यातील संबंधीत पिकांसाठी येणा-या उत्पादन खर्चाबरोबरच इतर घटकांचाही (जसे-मागणी आणि पुरवठा, आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमतीची स्थिती, बाजारातील किंमतीमध्ये होणारे चढ-उतार इत्यादी) विचार केला जातो. त्यानुसार केंद्रिय कृषि मूल्य व किंमत आयोग, विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमतीची शिफारस केंद्र शासनाकडे करते व त्या आधारे केंद्र शासन राष्ट्रीय पातळीवर आधारभूत किंमत योजनेत समाविष्ट शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्चित करुन जाहीर करीत असते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किंमती सर्व राज्यांना लागू होतात.

हमीभाव जाहीर करणे ही पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारितीतील बाब असून किमान हमी भाव वाजवी मिळावेत म्हणून राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घेत असते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यात ७९ व पालघर जिल्ह्यातील १५८ कामे अपूर्ण स्थितीत असल्याबाबत

(९) **४६५१** (२०-४-२०१५). **श्री. आनंद ठाकूर, श्री. सुनिल तटकरे, श्री. हेमंत टकले, श्री. राहुल नार्वेकर** : सन्माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यात ७९ व पालघर जिल्ह्यात १५८ कामे अपूर्ण स्थितीत असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, याची शासनाने पाहणी वा चौकशी केली आहे काय ;

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने सदर उर्वरित पेयजल योजनेची कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत ;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर** (९-९-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही. राष्ट्रीय पेयजल योजनांतर्गत मार्च २०१५ अखेर ठाणे जिल्ह्याचे ७९ गावे/पाड्यांचे संभाव्य उद्दीष्ट पूर्ण करण्याचे नियोजित होते. तथापि, त्यापैकी मार्च २०१५ अखेर ६३ गावे/पाड्यांचे उद्दीष्ट पूर्ण करण्यात आलेले आहेत. तसेच राष्ट्रीय पेयजल योजनांतर्गत मार्च २०१५ अखेर पालघर जिल्ह्याचे १५८ गावे/पाड्यांचे संभाव्य उद्दिष्ट पूर्ण करण्याचे नियोजित होते. तथापि, त्यापैकी मार्च २०१५ अखेर १३४

गावे/पाड्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आलेले आहेत. दोन्ही जिल्ह्यांचे उर्वरित उद्दीष्ट राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम २०१५-१६ च्या आराखड्यात समावेश असून मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवणा-या शाळा व्यवस्थापकांवर शासनाने कारवाई करण्याबाबत**

(१०) **५०४५** (१०-४-२०१५). **श्री. अनिल भोसले, श्री. जयवंतराव जाधव, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. दिपकराव साळुंके-पाटील, श्री. ख्वाजा बेग** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) पुण्यातील नूतन मराठी विद्यालयातील राहुल ढेबे या आठवीच्या विद्यार्थ्याचा आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परिक्षेचा (एनएमएमएस) ऑनलाईन अर्ज शाळेने वेळेत न भरल्याने हा विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय ;

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार या विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवणा-या शाळा व्यवस्थापकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (२५-८-२०१५) : (१) व (२) होय.

(३) मुख्याध्यापक व संबंधित दोन शिक्षकांनी त्यांच्या कर्तव्यामध्ये कसूर केल्याचे दिसून आले. तीनही कर्मचा-यांवर कारवाई करण्यासाठी संस्थेस कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भारत सरकार केंद्र पुरस्कृत देण्यात येणा-या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीबाबत**

(११) **५३४२** (२१-४-२०१५). **डॉ. अपूर्व हिरे** : अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक दुसरी मधील प्रश्न क्र. ४९७६१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) भारत सरकार केंद्र पुरस्कृत मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे प्रदानाकरीता सदर योजनेंतर्गत २०१४-२०१५ मध्ये मंजूर तरतूद रु. ७४८.०४ कोटी तसेच रु. १७५ कोटीची मान्य पुरवणी मागणी या मंजूर तरतुदीतून प्रलंबित शिष्यवृत्ती प्राधान्याने प्रदान करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय ;

(२) असल्यास, प्रस्तुत मंजूर तरतुदीतून प्रलंबित शिष्यवृत्तीने प्रदान करण्यात आले आहे काय ;

(३) नसल्यास, केंव्हापर्यंत करण्यात येईल ?

**श्री. राजकुमार बडोले** (२९-९-२०१५) : (१), (२) व (३) इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०१४-१५ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्तीची देयके प्रदान करण्यात आली आहेत. प्रलंबित शिष्यवृत्तीची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याच्या सूचना सर्व जिल्ह्यातील क्षेत्रिय अधिका-यांना देण्यात आल्या असून जशी देयके प्राप्त होतात त्यानुसार त्यांचे प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे.

### राज्यातील सामाजिक न्याय विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचा-यांचे वेतन थकीत असल्याबाबत

(१२) **५३४३** (२१-४-२०१५). **डॉ. अपूर्व हिरे** : तारांकित प्रश्न क्र. १७०२ ला दि. १८-१२-२०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागातील उच्च माध्यमिक आश्रमशाळांमधील कर्मचा-यांच्या वेतनाचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीच्या विचारार्थ सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उच्चस्तरीय समितीच्या निर्देशानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ;

(३) उच्चस्तरीय समितीचा अद्याप या प्रस्तावावरील विचार पूर्ण झाला नसल्यास, तो केंव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले** (२१-९-२०१५) : (१) व (२) विजाभज उच्च माध्यमिक आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदनिर्मितीचा व वेतनाचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावासंदर्भात उच्चस्तरीय समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या माहितीसह प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### परभणी जिल्ह्यातील आम आदमी योजनेच्या अपयशाबाबत

(१३) **५४६३** (१०-४-२०१५). **श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री. अमरसिंह पंडित, श्री. सतिश चव्हाण, श्री. विक्रम काळे** : सन्माननीय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) तलाठी, मुख्याध्यापक व इतर यंत्रणातील असमन्वयामुळे परभणी जिल्ह्यातील गरजु लाभार्थ्यांना आमा आदमी विमा योजनेचा लाभ मिळत नसल्याची तक्रार परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे केल्यावरून अप्पर जिल्हाधिकारी यांनी शिबीरे घेऊन अंमलबजावणी करण्याबाबतचे आदेश सन २०१४-१५ दरम्यान काढले होते, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, वरीलप्रमाणे आदेश काढूनही २० टक्क्यांपेक्षाही कमी उद्दिष्ट पूर्ण झाल्याने केवळ कंपन्यांचा फायदा होत असल्याचा आक्षेप उपविभागीय अधिकारी श्री. शिंदे यांनी जानेवारी, २०१५ दरम्यान वृत्तपत्रातून नोंदविला आहे काय ;

(३) असल्यास, उद्दिष्टयेपूर्तीसाठी टाळाटाळ करणा-या दोषी तलाठी, मुख्याध्यापक व इतर यंत्रणांची चौकशी करून त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली आहे काय ;

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले** (२०-८-२०१५) : (१) होय. जिल्हाधिकारी, परभणी यांनी शिबीरे घेऊन आम आदमी विमा योजनेच्या अंमलबजावणीबाबतचे आदेश काढलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०१४-१५ मध्ये परभणी जिल्ह्याकरिता ३४८०० एवढे उद्दिष्ट निश्चित केले असून त्यापैकी दि. २-६-२०१५ अखेर ६९५९ इतके उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. तसेच उर्वरित उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता माध्यमिक शाळा/महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व संबंधित गावातील तलाठी यांचेमार्फत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**अमरावती येथील वसतिगृहात व्यपगत असलेली पदे भरण्याबाबत**

(१४) **५४८६** (१०-४-२०१५). **श्री. श्रीकांत देशपांडे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) अमरावती येथील जिल्हा परिषद (माजी शासकीय) माध्यमिक शाळा (उर्दू कन्या) शाळा अमरावतीशी संलग्न व १९३७ पासून स्थापित मुस्लीम मुलीच्या वसतीगृहातील व्यपगत पदांना पुन्हा नव्याने मान्यता प्रदान करुन पद भरतीची परवानगी व सदरील वसतिगृह असल्यास, अल्पसंख्यांक विभागास जोडण्याविषयी दिनांक ६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांस अमरावती विभाग शिक्षक आघाडीच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्यावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ;

(३) असल्यास, मुस्लीम मुलींच्याकरिता असलेल्या वसतिगृहात व्यपगत असलेली पदे व ते वसतिगृह अल्पसंख्यांक विभागास जोडण्याविषयी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (१४-९-२०१५) : (१), (२) व (३) सदर निवेदन विभागात आढळून आले नाही. तथापि, जिल्हा परिषद (माजी शासकीय) माध्यमिक शाळा (उर्दू कन्या) शाळा, अमरावती येथे अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस ही आवश्यक पदे अनुदान उपलब्ध होईपर्यंत जिल्हा निधीमध्ये आवश्यक तरतुदी करुन कंत्राटी स्वरुपात मानधन तत्त्वावर भरण्यास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी देण्यात आली असून आवश्यकतेनुसार सदर पदे कंत्राटी तत्त्वावर भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाड तालुक्यातील मौजे गावडी येथील शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येबाबत**

(१५) **५८२१** (२१-४-२०१५). **श्री. हेमंत टकले, श्री. किरण पावसकर, श्री. नरेंद्र पाटील** : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) महाड तालुक्यातील (जि. रायगड) मौजे गावडी येथील शेतक-यांनी बँकेच्या कर्जाची परतफेड करु न शकल्याने तसेच यावर्षी फारसे पीक न आल्यामुळे या कर्जबाजारी शेतक-यांनी माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान विषारी किटकनाशक प्राशन करुन आत्महत्या केली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ;

(३) असल्यास, चौकशीचे स्वरुप काय आहे ;

(४) असल्यास, मृत शेतक-यांच्या नातेवाईकांना शासनाने कोणती मदत केली अथवा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे** (१-१०-२०१५) : (१) अंशतः खरे आहे. रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील मौजे गावडी येथील शेतकरी काशिनाथ गं. मालुसरे यांनी दि. २६-१२-२०१४ रोजी विषारी किटकनाशक प्राशन करुन आत्महत्या केलेली आहे.

(२) होय.

(३) तहसिलदार महाड, तालुका कृषि अधिकारी, महाड व महाड पोलिस यांनी केलेल्या संयुक्त चौकशीनुसार मयत शेतक-याने आत्महत्या कर्जाला कंटाळून केल्याचे दिसून आलेले नाही.

(४) आत्महत्या कर्जामुळे केलेली नसल्याचे दिसून आल्याने पात्र आत्महत्येप्रकरणी देण्यात येणारी रु. १.०० लक्ष रक्कम त्यांना अनुज्ञेय ठरत नसल्याने देण्यात आलेली नाही. तथापि, त्यांना कृषि विभागाचा लाभ देण्यात आलेला आहे.

---

**पेण अर्बन बँकेच्या मालमत्तांच्या मुल्यांकन, विक्री प्रक्रिया संदर्भात**

(१६) **५८४६** (२३-४-२०१५). **डॉ. नीलम गो-हे** : सन्माननीय सहकार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) पेन अर्बन बँकेच्या मालमत्तांच्या मुल्यांकन, विक्री प्रक्रिया संदर्भात व ठेवीदारांच्या प्रश्नांसंदर्भात रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पेण अर्बन ठेवीदार संघर्ष समितीचे अध्यक्ष व ठेवीदारांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत ;

(३) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने पेण अर्बन बँकेतील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ;

(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील** (३-१०-२०१५) : (१) होय.

(२) सदर बैठकीमध्ये महाराष्ट्र ठेवीदार हितसंरक्षण अधिनियम, १९९९ चे कलम ४ व ५ प्रमाणे गृह विभाग, महाराष्ट्र शासन, कफ परेड, मुंबई यांच्या दि. २४-७-२०१३ च्या अधिसुचनेनुसार शासनाने जप्त केलेल्या मालमत्तांपैकी १५ मालमत्तांचा लिलाव करणेबाबत उपविभागीय अधिकारी, पेण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(३) सदर समितीने मुल्यांकन प्रक्रीयेकरिता श्री. प्रमोद पाटील यांची मुल्यांकनकर्ता म्हणून नियुक्ती केली असून त्यास सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे. सदर मुल्यांकन-कर्त्यांकडून मुल्यांकन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मालमत्तांची लिलावाद्वारे विक्री करुन ठेवी परत करण्यात येणार आहे.

(४) बँकेवर आर्थिक निर्बंध लागू केल्यानंतर प्रत्येक ठेवीदारास रक्कम रु. १,००० याप्रमाणे १०५९८६ ठेवीदारास रु. १०,४६,७५,००० वाटप करण्यात आले आहेत. तसेच हार्डशिप अंतर्गत ४२६५ ठेवीदारांस रक्कम रु. १८,६२,४९,००० वाटप करण्यात आलेली आहे.

सद्यःस्थितीत बँकेत रक्कम रु. ५० कोटी, २५ लाख इतकी तरलता शिल्लक असून त्यापैकी स्टेट बँक ऑफ इंडिया, पेण शाखेत रक्कम रु. ३८.७६ कोटी ठेवीदारांकरिता मुदतठेव स्वरुपात गुंतविण्यात आली आहे.

भारतीय ठेव विमा व पतहमी महामंडळाची (DICGC) माहे मार्च २०१५ पर्यंतची प्रिमियमची रक्कम बँकेने भरणा केली आहे. त्यामुळे रु. १ लाखाचे आतील ठेवींना संरक्षण सुरु राहणार आहे.

अद्याप रु. १ लाखापर्यंत ठेवी असलेल्या खातेदारांच्या व रु. १ लाखावरील ठेवीदारांच्या अशा एकूण १९३५४७ ठेवीदारांच्या ठेवी रक्कम रु. ६२२३५.४७ लाख ठेवी परत करावयाची बाकी असून सदर ठेवी देण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत.

**राज्यात उद्योजकांकडे विनावापर पडून असणारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मोकळे भूखंड ताब्यात घेण्याबाबत**

(१७) **५९४१** (२३-४-२०१५). **श्री. अशोक उर्फ भाई जगताप** : सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्यात तथाकथित उद्योजकांकडे विनावापर पडून असणारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) मोकळे भूखंड ताब्यात घेण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असल्याचे माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, या निर्णयानुसार शासनाने मोकळे भूखंड ताब्यात घेण्याबाबत किती कंपन्यांवर कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई** (१-१०-२०१५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसीत केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना वाटप केलेल्या भूखंडाचा विहीत कालावधीत विकास केला नाही तर करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार महामंडळ भूखंड परत घेण्याची कार्यवाही सुरु करते. अशाप्रकारे महामंडळाने आतापर्यंत ३७३४ उद्योजकांना कारणे दाखवा नोटीसा दिल्या असून त्यापैकी ११०३ भूखंड परत महामंडळाने ताब्यात घेतले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सैनिकी शाळांमधून एनडीएला जाणा-या मुलांच्या संख्येत वाढ होण्याबाबत**

(१८) **६०३१** (२०-४-२०१५). **श्री. आनंद ठाकूर, श्री. संजय दत्त, श्री. हेमंत टकले** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्य शासनाने १९९६-९७ पासून सैनिकी शाळा राज्यात सुरू करण्यास परवानगी दिल्याने ३३ मुलांच्या सैनिकी शाळा अनुदानावर सुरु आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, गत १६ वर्षात उक्त शाळांवर २०० कोटी रुपये शासनामार्फत अनुदानापोटी खर्च झाले आहेत, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, गत १५ वर्षात फक्त ३० मुले एनडीए पर्यंत पोचली, हेही खरे आहे काय ;

(४) असल्यास, उक्त बाब क्र. १, २ व ३ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय ;

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सैनिकी शाळांमधून एनडीए पर्यंत मुले जाण्यामध्ये वाढ होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ;

(६) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (१४-९-२०१५) : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) होय.

(५) व (६) एन.डी.ए. मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी दाखल होण्याकरिता सैनिकी शाळा अभ्याक्रमात सुधारणा करुन सी.बी.एस.ई. दर्जाचा अभ्यासक्रम तयार करणे तसेच राज्यातील सैनिकी शाळांची तपासणी करुन तपासणी अहवालानुसार शाळांची प्रतवारी करणे असा निर्णय मा. मंत्री (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २६-३-२०१५ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही चालू आहे.

---

### राज्यात RTE ॲक्टनुसार शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त

(१९) **६०५२** (२०-४-२०१५). **श्रीमती स्मिता वाघ** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्यात RTE ॲक्टनुसार शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याने अतिरिक्त कामाच्या ताणाचा शिक्षकांवर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, शिक्षकांची रिक्त पदे केव्हा भरणार, याबाबत शासनाचे धोरण काय आहे ;

(३) राज्यात डी. एड. धारक शिक्षक भरती २०१० नंतर न झाल्याने नोकरीपासून वंचित आहेत, हेही खरे आहे काय ;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (१४-९-२०१५) : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बीड जिल्हा शिक्षण विभागातील रिक्त पदे भरणेबाबत

(२०) **६३१८** (२०-४-२०१५). **श्री. अमरसिंह पंडित, श्री. धनंजय मुंडे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) बीड जिल्ह्याच्या शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी-२, उपशिक्षणाधिकारी-४, गटशिक्षणाधिकारी-१०, मुख्याध्यापक (वर्ग २)-२४ अशी अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, शिक्षण विभागातील अधिका-यांच्या रिक्त पदाचा पदभार देतांना कोणतेही निकष न लावता बेकायदेशीररितीने कनिष्ठ कर्मचा-यांकडे देण्यात आली आहेत, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, शिक्षण विभागात अवैधरितीने कर्मचा-यांच्या प्रतिनियुक्त्या करुन त्यांच्याकडे अधिका-यांचे पदभार दिलेले आहेत, हेही खरे आहे काय ;

(४) असल्यास, शिक्षण विभागात निर्माण झालेले गोंधळाचे वातावरण दूर करण्यासाठी अधिका-यांची रिक्त पदे भरुन बेकायदेशीर प्रतिनियुक्त्या रद्द करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे** (२५-८-२०१५) : (१) हे अंशतः खरे आहे

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) मागील काही महिन्यात बरीच पदे भरली असून बाकीची पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद यांच्या प्राथमिक शिक्षकांना ई-प्रशिक्षण देण्याबाबत**

(२१) **७३११** (४-८-२०१५). **श्री. नागो गाणार, श्री. अनिल सोले, श्री. रामनाथ मोते, श्री. मितेश भांगडिया** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद आणि महाराष्ट्र राज्य प्राथमिक प्रशिक्षण परिषद यांच्या विद्यमाने दि. २७ एप्रिल, २०१५ पासून प्राथमिक शिक्षकांचे ई-प्रशिक्षण घेण्यात आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, या प्रशिक्षणादरम्यान शिक्षकांना पाठ्यपुस्तके न देता प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मिळालेल्या पुस्तकातील शंका कोणाला विचाराच्या हा प्रश्न शिक्षकांना पडल्यामुळे या प्रकरणी शासनातर्फे कोणती उपाययोजना करण्यात येत आहे वा येणार आहे ?

**श्री. विनोद तावडे** (१४-९-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) शासनाने प्रथमच व्हर्च्युअल प्रशिक्षणाचा प्रयत्न केला असून, त्यासंदर्भात येणा-या सर्व संभाव्य अडचणी लक्षात घेऊन प्राचार्य, जेष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, गटसाधन केंद्रातील साधन व्यक्ती, राज्य व जिल्हा स्तरावर सुलभकांचे प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तींना शाळांना भेटी द्याव्यात व शिक्षकांना दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रीयेत काही अडचणी जाणवत असल्यास काही शंका असल्यास त्याचे निरसन करावे अशा सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच, विद्या परिषद व बालभारती यांचेकडे शिक्षकांना काही शंका असल्यास ई-मेल अथवा पत्राद्वारे कळविण्याबाबत सांगण्यात आले होते.

---

**महाराष्ट्र राज्य शिक्षण माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळ, नागपूर विभागाला पुर्ण वेळ अध्यक्ष व सचिव पदे देण्याबाबत**

(२२) **७३२१** (४-८-२०१५). **श्री. अनिल सोले, श्री. नागो गाणार, श्री. मितेश भांगडिया** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) महाराष्ट्र राज्य शिक्षण माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळ, नागपूर विभागाला पुर्ण वेळ अध्यक्ष व सचिव हे दोघेही प्रभारी आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, याचा परिक्षा व्यवस्थेवर परिणाम होतो, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, उक्त पद पुर्ण वेळ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (१४-९-२०१५) : (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) विभागीय अध्यक्ष या पदावर पूर्ण वेळ अधिकारी देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

**कायम शब्द वगळून विनाअनुदानित तत्वावरील शाळांना निधी उपलब्धतेसाठी अनुदान प्राप्त करण्याबाबत**

(२३) **७३४८** (४-८-२०१५). **श्री. अनिल सोले, श्री. नागो गाणार, श्री. मितेश भांगडिया** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयानुसार कायम शब्द वगळून विनाअनुदानित तत्वावरील शाळांना निधी उपलब्धतेनुसार अनुदान प्राप्त होईल असा निर्णय झाला, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, मा. शिक्षण संचालक यांनी शालेय संस्थाकडून ऑनलाईन माहिती मागितली, हेही खरे आहे काय ;

(३) अंतिमतिथी ३० नोव्हेंबर, २०१४ ला असूनही वेबसाईड दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी बंद करण्यात आली, हेही खरे आहे काय ;

(४) तसेच सदरहू वेबसाईड कोणी बंद केली ;

(५) ह्यामुळे अनेक संस्थांना त्रास झाला व त्यामुळे ते माहिती पाठवू शकले नाही, त्याकरिता दुसरी कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात आली होती, तसेच मा. मुख्यमंत्री महोदयांनी आदेश दिल्यानंतरही संबंधीत विभागाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे** (१४-९-२०१५) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) दि. ३० नोव्हेंबर, २०१४ पर्यंत ऑनलाईन मुल्यांकनाची वेबसाईट सुरू होती.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची थकबाकी अदा करण्याबाबत**

(२४) **७८८२** (३१-७-२०१५). **श्री. ख्वाजा बेग, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. दिपकराव साळुंखे-पाटील, श्री. अनिल भोसले, श्री. आनंद ठाकूर, श्री. नरेंद्र पाटील, श्री. किरण पावसकर, श्री. हेमंत टकले, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी** : सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सुमारे १० हजार कर्मचा-यांचे सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाचे सुमारे २५० कोटी मंत्रिमंडळाच्या मंजुरी अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर वेतन फरकाच्या रक्कमेस मंजुरी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप मंजुरी दिली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर** (१-९-२०१५) : (१) नाही.

(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांना ६ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीपोटी द्यावयाच्या रकमेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्या आदेशानुसार तसेच म.जी.प्रा.च्या मागणीनुसार नगर विकास विभागाकडील थकबाकीपैकी रु.१५८.१० कोटी आणि ग्राम विकास विभागाकडील थकबाकीपैकी रु.९१.९० कोटी अशी एकूण रु.२५०.०० कोटी इतकी रक्कम त्या विभागांकडून वळती करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील १०६ गावांतील पाणी नमुने दूषित आढळल्याबाबत**

(२५) **८०२१** (४-८-२०१५). **श्री. रामराव वडकुते** : सन्माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) हिंगोली जिल्ह्यातील १०६ गावांतील पाणी नमुने दूषित आढळून आले आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, या गावांमध्ये पाणी शुद्ध करण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे कोणती उपाययोजना करण्यांत आली आहे ;

(३) असल्यास, उपाययोजना केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर** (१-९-२०१५) : (१) होय. हे खरे आहे.

(२) उच्च प्रतिच्या ब्लिचिंग पावडरच्या सहाय्याने पाणी स्त्रोतांचे शास्त्रोक्त पद्धतीने शुद्धीकरण करण्यात आले आहे. तसेच स्त्रोतांच्या आजुबाजूचा परिसर स्वच्छ करणे, नालीतील तुंबलेले पाणी वाहते करणे, फुटलेले कठडे तसेच स्त्रोतांच्या भोवतालचे खड्डे मुरमाच्या सहाय्याने भरून घेणे इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य भारनियमनमुक्त करण्याबाबत**

(२६) **८१८६** (३१-७-२०१५). **श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ. सुधीर तांबे, श्री. राजेंद्र मुळक, श्री. संजय दत्त, श्री. मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, श्री. रामहरी रुपनवर, श्री. शरद रणपिसे** : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) महाराष्ट्र राज्य भारनियमनमुक्त करण्याबाबत शासनाने आजपर्यंत विविध उपाययोजना केल्या आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, राज्य भारनियमनमुक्त करणे किती वर्षात अपेक्षित आहे ;

(३) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** (३-९-२०१५) : (१) होय हे खरे आहे.

(२) महावितरणाची सध्याची कमाल मागणी १५५०० मे.वॅ. ते १६३०० मे.वॅ. एवढी आहे. सध्या वीजेच्या मागणीनुसार, वीजेची उपलब्धता आहे. सद्यास्थितीत भारनियमन वीजेच्या कमतरतेमुळे करण्यात येत नसून, फक्त आणीबाणीच्या परिस्थितीत आवश्यकता भासल्यास, अधिक वितरण व वाणिज्य हानी असलेल्या वाहिन्यांवर आणीबाणीच्या कालावधीपुरते भारनियमन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धान खरेदीमध्ये शासनाने बोनस जाहीर केल्याबाबत**

(२७) **८२३४** (४-८-२०१५). **श्री. राजेंद्र जैन** : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) धान खरेदीमध्ये शासनाने खरीप व रब्बी या दोन्ही पिकांसाठी बोनस जाहीर केले हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, जे शेतकरी फक्त शासनाच्या धान केंद्रावर विक्री करतात त्यांनाच हे बोनस देणार आहेत, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, जे शेतकरी उच्च प्रतीच्या धानाची उत्पादन करतात त्यांना शासनाकडून देण्यात येणारे बोनस प्रति एकरी प्रमाणे बोनस देण्यात येणार आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजना तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट** (४-९-२०१५) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत फक्त खरीप पणन हंगाम २०१४-१५ मध्ये शासन खरेदी केंद्रावर खरेदी केलेल्या धानासाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या दराव्यतिरिक्त धान उत्पादक शेतक-यांना प्रति क्विंटल रु.२५० प्रोत्साहनपर राशी मंजूर करण्याबाबत दि. २१ मे, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळमना मार्केटमध्ये (जि.नागपूर) धान्याची पोती उघड्यावर पडलेली असल्याबाबत**

(२८) **८२७१** (४-८-२०१५). **श्री. प्रकाश गजभिये** : सन्माननीय पणन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) कळमना मार्केटमध्ये (जि.नागपूर) धान्याची हजारो पोती उघड्यावर पडलेली आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर धान्य पावसाळ्यात सडण्याची भिती निर्माण झाली असून याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** (५-१०-२०१५) : (१) हंगामामध्ये मोठ्या प्रमाणात धान्य विक्रीकरिता बाजार समितीमध्ये येत असते. व्यापा-यांनी खरेदी केलेले धान्य बाजार समितीमधून वेळीच न उचलल्यामुळे धान्याची पोती तसेच पडून राहण्याचे प्रकार कधीकधी होतात.

(२) शेतक-यांसाठी धान्याची १२ मोठी लिलाव दालने बांधलेली आहेत. व्यापा-यांनी त्याच्या मालाची स्वतः व्यवस्था करावयाची आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जवळील शिवापूर बाग या ऐतिहासिक गावानजीक प्राचीन कोरीव लेण्यांचा शोध लागल्याबाबत**

(२९) **८५०१** (४-८-२०१५). **श्री. शरद रणपिसे, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, श्री. संजय दत्त** : सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) पुणे जवळील शिवापूर बाग या ऐतिहासिक गावानजीक इसवीसनाच्या पहिल्या ते तिस-या शतकातील तीन प्राचीन कोरीव लेण्यांचा शोध माहे एप्रिल, २०१५ मध्ये अथवा त्यासुमारास लागलेला असून सदर लेण्यांचा आकार व स्वरुप पाहता ती बौध्द भिक्षू, यात्रेकरु तसेच व्यापारी यांच्या तात्पुरत्या निवासासाठी कोरलेली असावीत असे स्पष्ट होत असल्याचे दिसून येत आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, या प्राचीन ऐतिहासिक लेण्यांची पाहणी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे ;

(३) असल्यास, उक्त लेण्यांचे जतन व्हावे यासाठी राज्य शासनाकडून कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (५-१०-२०१५) : (१), (२) व (३) हे खरे नाही. सहायक संचालक पुरातत्व विभाग पुणे यांनी सदर लेण्यांची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. अशा प्रकारच्या लेण्या महाराष्ट्रात प्राचीन व्यापारी मार्गावर मोठ्या प्रमाणात दिसून येतात. सदर लेण्या राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यायोग्य नाही.

---

**महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक धोरणाबाबत**

(३०) **८५०५** (४-८-२०१५). **श्री. शरद रणपिसे, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, श्री. संजय दत्त** : सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्षात म्हणजेच सन २०१० मध्ये राज्याचे सांस्कृतिक धोरण अस्तित्वात येऊन त्यात अनेक महत्त्वपूर्ण योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत व दर पाच वर्षांनी या धोरणाचा आढावा घेण्यात येईल आणि त्यात आवश्यकतेनुसार फेरबदल करण्यात येतील असे सदर धोरणात नमूद करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय ;

(२) तसेच सांस्कृतिक उपक्रम आणि धोरण मसुदा यामध्ये नमूद केलेल्या योजनांच्या पुर्ततेसाठी अर्थसंकल्पातील तरतुदींच्या जोडीने राज्य शासनाचा स्वतंत्र असा "राज्य सांस्कृतिक निधी" स्थापन करण्यात येईल असे सांस्कृतिक धोरणात नमूद करण्यात आलेले आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, सदर धोरणातील योजनांची अंमलबजावणी संथगतीने झालेली असून अर्थसंकल्पात निधी अत्यल्प प्रमाणात उपलब्ध करण्यात आलेला असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हेही खरे आहे काय ;

(४) उक्त सांस्कृतिक धोरण जाहिर करुन पाच वर्षांचा कालावधी झालेला असल्यामुळे आता त्याचा आढावा घेण्यात आला आहे काय, असल्यास, त्यातील कोणत्या योजनांची अंमलबजावणी झालेली नाही, त्याची कारणे काय आहेत व मागील पाच वर्षात किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे ;

(५) उक्त धोरणाचा आढावा घेण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व आढावा घेण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे** (२१-९-२०१५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) आढावा घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बारकोड संगणकीकृत शिधावाटप पत्रिका देण्यास होणारा विलंब

(३१) **८५०६** (४-८-२०१५). **श्री. शरद रणपिसे, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, श्री. संजय दत्त** : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ राज्यात लागू झालेला असून या अनुषंगाने केंद्र शासनाच्या निर्देशानुसार एनआयसी कॉटन ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर (सीएएस) प्रमाणे राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरणाचा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून याचाच भाग म्हणून बारकोडडेड संगणीकृत शिधापत्रिका सुमारे २ महिन्यांच्या कालावधीत देण्याचा निर्णय राज्य शासनाने दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतलेला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे किती कालावधीत करण्यात येणार आहे व त्याची सद्यःस्थिती काय आहे ;

(३) उक्त दिनांक ११ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयानुसार बारकोडेड संगणीकृत शिधापत्रिका देण्याचे काम अतिशय मंदगतीने सुरू असून ५० टक्केही काम झालेले नसल्याचे उघड झाल्यामुळे सदर कामाची सद्यःस्थिती काय आहे व हे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष बापट** (३-९-२०१५) : (१), (२) व (३) दि. ११ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांना संगणकीकृत बारकोडेड शिधापत्रिका देण्यात येणार आहेत.

सद्यःस्थितीत एनआयसी, दिल्ली ने उपलब्ध करून दिलेल्या कॉमन ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर च्या PDS Database मध्ये लाभार्थ्यांचा आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक व मोबाईल क्रमांक इ. माहिती समाविष्ट करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे. ही माहिती UIDAI कडून तपासून घेतल्यानंतर डिसेंबर, २०१५ पर्यंत शिधापत्रिकेची छपाई करण्याचे नियोजन आहे. तद्‌नंतर मार्च, २०१६ पर्यंत टप्प्या टप्प्याने रास्तभाव दुकानांचे ऑटोमेशन करण्यात येणार आहे.

**सोलापूर जिल्ह्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९ पाणी पुरवठा योजना असल्याबाबत**

(३२) **८७१५** (४-८-२०१५). **श्री. रामहरी रूपनवर, श्री. संजय दत्त** : सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) सोलापूर जिल्ह्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९ पाणीपुरवठा योजना अद्याप बंद आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदर योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर** (२८-८-२०१५) : (१) होय.

(२) सद्यःस्थितीमध्ये सदर योजनांमध्ये समाविष्ट असलेल्या गावांकडून पाणी पुरवठा करण्याची मागणी नसल्याने या नऊ प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना बंद आहेत. सदर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांतील समाविष्ट गावांकडून पाणी पुरवठा करण्याची मागणी आल्यास आवश्यकतेनुसार योजना दुरूस्ती करून पाणी पुरवठा करण्याची जिल्हा परिषदेची तयारी आहे.

---

**येरवडा (ता.जि.पुणे) येथील नागपूरचाळीतील (एसएनबीपी) शाळेमध्ये निकालपत्र, ओळखपत्र वगैरेबाबत अवाजवी शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत**

(३३) **८८६५** (४-८-२०१५). **श्रीमती दिप्ती चवधरी, श्री. संजय दत्त, श्री. रामहरी रुपनवर, श्री. अनंत गाडगीळ** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) येरवडा (जि. पुणे) तालुक्यातील नागपूर चाळीतील (एसएनबीपी) शाळेमध्ये इयत्ता चौथीचे शालेय निकालपत्र पाचशे रुपये, ती ओळखपत्राची किंमत चारशे लावली जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उक्त शाळेने वाढविलेली फी, सर्व शैक्षणिक साहित्य घेण्याचे बंधन आणि सांगितलेल्या दुकानातुनच वस्तूची खरेदी करण्याची सक्ती केली असून प्रश्न भाग १ मधील प्रमाणपत्राकरिता अवाजवी पैसे आकारण्यात येत असल्याने पालकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय ;

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (१४-९-२०१५) : (१) व (२) सदर शाळेमध्ये निकालपत्र, संचयी नोंद पत्रक, सीसीई रेकॉर्ड या सर्व गोष्टींसाठी पाचशे रुपये घेतले जातात. गणवेश किंवा पुस्तके ठराविक दुकानातून खरेदी करण्याची सक्ती करण्यात येत नाही असे चौकशीअंती निदर्शनास आले आहे. याबाबत शाळेकडे अथवा शिक्षण मंडळ कार्यालयाकडे कोणत्याही पालकाची तक्रार आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**ता. देगलूर, जि. नांदेड येथील वाघाळा पॉवर हाऊसमध्ये सी.पी. जळाल्यामुळे नागरिकांना होत असलेला त्रास**

(३४) **८९५६** (३१-७-२०१५). **श्री. अमरनाथ राजूरकर, श्री. संजय दत्त, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, श्री. सुभाष झांबड** : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) ता. देगलूर, जि. नांदेड येथील वाघाळा पॉवर हाऊसमध्ये सी.पी. जळाल्यामुळे दिनांक ९ मे, २०१५ रोजी दिवसभर विजेची ये-जा सुरु असून रात्री ९.०० वा. अचानक विज गेल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, नागरिकांना होत असलेल्या त्रासामुळे सदरहू पॉवर हाऊसचे काम व्यवस्थित करण्याबाबत शासनाने कोणती आवश्यक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ;

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** (३-१०-२०१५) : (१) दि. ९ मे, २०१५ रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास १३२ के.व्ही. नर्सी फिडरची वाय-फेज सी.टी. नादुरुस्त झाल्याने विद्युत पुरवठ्यात व्यत्यय निर्माण झाला होता.

(२) नादुरुस्त सी.टी. बदलण्याचे काम महापारेषण कंपनीकडून लगेचच हाती घेऊन वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला. देगलूर उपकेंद्रामध्ये अखंडित विद्युत पुरवठा करण्यासाठी अतिरिक्त स्त्रोत उपलब्ध व्हावा म्हणून प्रस्तावित २२० के. व्ही. नर्सी उपकेंद्रातून थेट १३२ के.व्ही. वाहिनी देगलूरपर्यंत उभारणीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. तसेच प्रस्तावित २२० के.व्ही. जळकोट उपकेंद्रातून १३२ के.व्ही. देगलूर उपकेंद्रास स्वतंत्र १३२ के.व्ही वाहिनीद्वारे वीजपुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे अंजनवेल (ता. गुहागर, जि. रत्नागिरी) येथील बंद पडलेला वीज निर्मिती प्रकल्प देखभाल व दुरूस्ती बरोबर सुरू करण्याबाबत**

(३५) **९०२८** (३१-७-२०१५). **श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, श्री. संजय दत्त** : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) मौजे अंजनवेल (ता. गुहागर, जि. रत्नागिरी) येथील गॅस टंचाईमुळे प्रदीर्घ काळासाठी वीज निर्मिती बंद पडलेल्या गॅस आणि विद्युत प्रकल्पाला केंद्र शासनाने सहाय्य केले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, गॅस आणि विद्युत प्रकल्पाकडून रेल्वेकरिता वीज पुरवठा करण्याचे नक्की केले असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, सदर विद्युत प्रकल्पाची वीज निर्मिती प्रदीर्घ काळासाठी बंद असल्याने केवळ देखभालीसाठी ठेवलेला प्रकल्प आता देखभाल व दुरूस्ती बरोबर सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** (५-१०-२०१५) : (१) होय.

(२) होय.

(३) प्रकल्प नव्याने सुरू करण्यासाठी शासनस्तरावर व्हॅट, एन्ट्री टॅक्स माफ करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच केंद्र शासनाच्या पॉवर सिस्टीम डेव्हलपमेंट फंड (PSDF) मधून आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत भारत सरकारकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भालेर (ता. जि. नंदुरबार) येथे स्थापन करावयाच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

(३६) **९०९३** (३-८-२०१५). **श्री. चंद्रकांत रघुवंशी, श्री. संजय दत्त, श्री. रामहरी रुपनवर** : सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) भालेर (ता. जि. नंदुरबार) येथे शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी आवश्यक असणा-या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई** (१-१०-२०१५) : (१) होय. हे खरे आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नंदुरबार जिल्ह्यातील (भालेर) येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे.

(२) भालेर (ता. जि. नंदुरबार) येथील औद्योगिक क्षेत्रासाठी तापी नदीवरील प्रकाशा बंधा-यातून ४.५० द.ल.घ.मी. पाण्याच्या आरक्षणाचा प्रस्ताव मुख्य अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी जलसंपदा विभागाकडे शिफारस करुन सादर केला आहे. तसेच सदर औद्योगिक क्षेत्रासाठी कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना व पायाभूत सुविधांसंबंधीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यासंबंधीची कार्यवाही महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांच्या शेतमालाला योग्य भाव देण्याबाबत**

(३७) **९२१४** (२९-७-२०१५). **श्री. विक्रम काळे, श्री. सतिश चव्हाण, श्री. दिपकराव साळुंखे-पाटील** : सन्माननीय पणन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्यात शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी पणन विभागातर्फे शेतमालाचे ब्रँडिग करुन तो माल विक्री करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** (५-१०-२०१५) : (१) होय.

(२) विदर्भातील "जय श्रीराम" या नावाने सुप्रसिद्ध उच्च दर्जाचे धान थेट शेतक-यांकडून खरेदी करुन कृषि पणन मंडळामार्फत, त्यावर आवश्यक त्या प्रक्रिया पुर्ण करुन, सदर तांदुळ राज्यातील मुख्य शहरातील बाजार

पेठेत "महाराईस" या नावाने ब्रँडिग करुन त्याची विक्री केलेली आहे. कृषि पणन मंडळामार्फत केलेल्या "महाराईस" तांदळाची १० किलोचे पॅकेजिंगमध्ये विक्री करण्यात आली आहे. राज्यातील मुख्य शहरात एकूण ११५३ क्विंटल तांदुळ विक्री केलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये तज्ञ व्यक्तींची विशेष निमंत्रित म्हणून नियुक्ती करण्याचा घेतलेला निर्णय**

(३८) **९५०७** (२९-७-२०१५). **श्री. नरेंद्र पाटील, श्री. धनंजय मुंडे, श्री. हेमंत टकले, श्री. सुनिल तटकरे, श्री. किरण पावसकर, श्री. संदिप बाजोरिया, श्री. ख्वाजा बेग, ॲड. निरंजन डावखरे** : सन्माननीय पणन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये (एपीएमसी) कृषि, कृषि पणन, कृषि प्रक्रीया, वाणिज्य, अर्थ आणि विधी या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना विशेष निमंत्रित म्हणून शासनामार्फत नियुक्त करण्याचा महत्वपूर्ण निर्णय दिनांक २० मे, २०१५ रोजी शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** (८-१०-२०१५) : (१) होय.

(२) यासंदर्भात शासनाने दि. १६-६-२०१५ रोजी अध्यादेश प्रख्यापित केला आहे. सदर अध्यादेशानुसार दि. १०-८-२०१५ रोजी कोल्हापूर कृषि उत्पन्न बाजार समितीवर ४ विशेष निमंत्रितांची नियुक्ती शासनाने केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शाळाबाह्य मुलांबाबत करावयाची कार्यवाही**

(३९) **९५५९** (४-८-२०१५). **ॲड. अनिल परब, डॉ. निलम गो-हे, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, श्री. संजय दत्त, श्री. राजेंद्र मुळक** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्यातील शाळाबाह्य मुले शोधण्याअंतर्गत दि. ४ जुलै, २०१५ रोजी घरोघरी, बसस्थानके, रेल्वे स्टेशन, बाजार व इतर ठिकाणी फिरुन शाळेत न जाणारी मुले शोधण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर योजनेचे उद्दिष्ट व स्वरुप काय आहे ?

**श्री. विनोद तावडे** (१४-९-२०१५) : (१) होय.

(२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास शाळेच्या पटावर नोंदविले जाणे, नियमित शाळेत दाखल करणे आणि त्याला दर्जेदार शिक्षण मिळणे हे हक्क प्राप्त झाले आहेत.

सदर बाब विचारात घेऊन राज्यात दि. ४ जुलै, २०१५ रोजी शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी व्यापक सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणासाठी महानगरपालिका स्तरावर महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हास्तरावर जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली, तालुका स्तरावर तहसीलदार व गाव स्तरावर सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली समित्या गठीत करण्यात आलेल्या होत्या. या समित्यांच्या नियंत्रणाखाली सर्व जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षक नियुक्त करुन प्रति सर्वेक्षक १०० घरांचे सर्वेक्षण करण्यात आले.

---

**आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण विभागाकडून मुल्यमापन करण्याबाबत**

(४०) **९५८०** (३-८-२०१५). **डॉ. निलम गो-हे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण विभागाकडून वेगळे धोरण ठरवून त्यांचे मुल्यमापनही वेगळ्या पद्धतीने करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, या संदर्भात माहे मे, २०१५ मध्ये शिक्षण सचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, सदर बैठकीत कोणता निर्णय घेण्यात आला त्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे ;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (६-१०-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) दिनांक २२ जून, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत असून, त्या अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यांची सर्वांगीण शैक्षणिक प्रगती साधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात जिल्हानिहाय किल्ल्याचे गॅझेटियर तयार करण्याच्या निर्णयाबाबत**

(४१) **९७२१** (४-८-२०१५). **श्रीमती स्मिता वाघ, श्री. अनिल भोसले, श्री. जयवंतराव जाधव** : सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्यात जिल्हानिहाय ऐतिहासिक किल्ल्याचे गॅझेटिअर तयार करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने काय नियोजन केले त्याचा तपशिल काय आहे ;

(३) सदर योजनेअंतर्गत किल्ल्याचे संवर्धन करण्याचे दृष्टीने शासन कोणकोणत्या योजना व कामे हाती घेणार आहे ;

(४) उक्त भाग (१) मध्ये उल्लेखित योजनेची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. विनोद तावडे** (२३-९-२०१५) : (१) नाही. दर्शनिका विभाग संपादक मंडळाच्या बैठकीत महाराष्ट्रातील किल्ले या विषयावर राज्य गॅझेटिअरचे काम हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) दर्शनिका विभागाच्या तत्कालीन संपादक मंडळातील सदस्यांकडे हे काम सोपविण्यात आले आहे.

(३) राज्यातील गड किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याकरीता आवश्यकतेनुसार तरतूद करण्यात येते. सदर किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी मार्गदर्शन करण्याकरीता दि. ३० मार्च २०१५ च्या शासन निर्णयान्वये मा. मंत्री (सां.का.) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) महाराष्ट्रातील किल्ले या विषयावर राज्य गॅझेटिअरचे काम हाती घेण्यात आले आहे.

---

**आडगांव (जि. नाशिक) येथील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संपादित जागेवरील बांधकामासंदर्भातील अडचणींचे निवारण होणेबाबत**

(४२) **९८६०** (४-८-२०१५). **डॉ. अपूर्व हिरे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) आडगांव (जि. नाशिक) येथील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या १४ वर्षापासून संपादित जागेवरील इमारतीचे बांधकाम अद्यापपर्यंत न झाल्याने या जागेवर अतिक्रमण होत असल्याच्या पार्श्वभुमीवर बांधकामासंदर्भातील अडचणी दुर करण्यात याव्यात, अशी मागणी लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी मा. शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक १२ जानेवारी, २०१५ चे पत्रान्वये केली आहे, हेही खरे आहे काय ;

(२) असल्यास, प्रश्नोक्त मागणीबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे** (६-१०-२०१५) : (१) हे खरे आहे

(२) व (३) इमारत बांधकामाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

**पठाणवाडी झोपडपट्टीत नामांकित दूध पिशव्यांचे टॅपरिंग करुन भेसळ केल्याबाबत**

(४३) **१०३६८** (४-८-२०१५). **श्री. सुनिल तटकरे, श्री. हेमंत टकले, श्री. किरण पावसकर, श्री. नरेंद्र पाटील, अ‍ॅड. निरंजन डावखरे** : सन्माननीय अन्न व औषध प्रशासन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) मालाड येथील पठाणवाडी झोपडपट्टीत नामांकित दूध पिशव्यांचे अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी टॅपरिंग करुन भेसळ करताना एका टोळीला दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास अटक करण्यात आली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, या प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली आहे ;

(३) असल्यास, या टोळीकडून किती किंमतीचा दूधसाठा जप्त करण्यात आला आहे ;

(४) असल्यास, त्यांच्यावर कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. गिरीष बापट** (५-९-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

तथापि, सदर धाड ही दिनोक २७ मे, २०१५ रोजी टाकण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी एका व्यक्तीस अटक करण्यात आली होती. कायद्यातील तरतूदीनुसार संबंधित व्यक्तीविरुद्ध कुरार पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविला आहे.

(३) रुपये ७४८६ इतक्या किंमतीचा दुधाचा १९७ लिटर साठा जप्त करण्यात आला आहे.

(४) सदर व्यक्ती दुधात पाणी मिसळून दुधाच्या पिशव्या पुर्नबंद करीत असताना रंगेहाथ पकडल्याने सदर व्यक्तीविरुद्ध न्यायालयीन कारवाई करण्यात येत आहे.

---

## एस. टी. महामंडळातील चालकांच्या भरती प्रक्रियेबाबत

(४४) **१०३९७** (३०-७-२०१५). **श्री. अनंत गाडगीळ** : सन्माननीय परिवहन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) एस. टी. महामंडळात चालकांच्या ७ हजार ६३७ पदांकरिता भरतीची प्रक्रिया सुरु झाली असून या पदावर नियुक्त केल्या जाणा-या उमेदवारांना नोकरीत असेपर्यंत नशापाणी करणार नाही आणि तंबाखू खाणार नाही अशी प्रतिज्ञापत्र लिहून देणे बंधनकारक केले जाईल असे शासनाने जाहीर केले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, ही अटीसापेक्ष भरती करण्यासाठी शासनाने अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते** (१-१०-२०१५) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने चालक भरती कार्यवाहीबाबत दिनांक ८-७-२०१५ रोजी परिपत्रक निर्गमित करुन नव्याने सेवेत येणा-या चालकांकडून परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या विहित नमुन्यामध्ये शपथपत्र घेण्याबाबत महामंडळास निर्देश देण्यात आले आहेत.

---

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर (एमपीसीबी) कायद्यानुसार आवश्यक असलेल्या पूर्ण सदस्यांची नियुक्ती न झाल्याबाबत

(४५) **१०४६५** (४-८-२०१५). **श्री. हरिसिंग राठोड, श्री. आनंदराव पाटील, श्री. रामहरी रुपनवर, श्री. संजय दत्त, श्री. अशोक उर्फ भाई जगताप** : सन्माननीय पर्यावरण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर (एमपीसीबी) कायद्यानुसार आवश्यक असलेल्या पूर्ण सदस्यांची नियुक्ती न झाल्याने संपूर्ण मंडळ एक आठवड्यात स्थापन करा अन्यथा अवमानाच्या कारवाईस सामोरे जा असा कडक इशारा मा. मुंबई उच्च न्यायालयाने शासनास दिला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या चेअरमनपदी पर्यावरण क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीबरोबरच सरकारने नियुक्त केलेले ५ सदस्य, राज्यातील स्वराज्य संस्थामधील ५ सदस्य तसेच शेती, मच्छिमारी, उद्योग क्षेत्रातील ३ सदस्य आणि राज्य सरकारच्या महामंडळातून २ सदस्य आणि पर्यावरण खात्याचे सचिव यांचा समावेश असूनही मात्र राज्य सरकारने एकही पद भरलेले नाही, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्य शासनाने उक्त प्रश्नाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम** (४-९-२०१५) : (१) जनहित याचिका क्रमांक १८३/२०१२ यामध्ये मा. उच्च न्यायालय यांनी दिनांक २७-३-२०१५ अन्वये दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ मधील कलम ४(२) नुसार लवकरात लवकर करण्यात यावी, असे आदेश दिलेले आहेत.

(२), (३) व (४) हे खरे नाही, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार अपर मुख्य सचिव, पर्यावरण यांचेकडे सोपविण्यात आला आहे. तसेच मंडळावरील शासनाचे प्रतिनिधित्व करणारे ५ सदस्य व राज्य शासनाचे नियंत्रण/व्यवस्थापन असलेल्या मालकीच्या कंपनीचे/महामंडळाचे प्रतिनिधित्व करणारे दोन सदस्य यांच्या नियुक्त्या दिनांक २-११-२०१४ च्या अधिसूचने अन्वये करण्यात आल्या असून ते सदस्य आजतागायत कार्यरत आहेत.

राज्यामध्ये काम करीत असलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे ५ अशासकीय सदस्य व कृषी, मत्स्यव्यवसाय, उद्योग आणि व्यापार यांच्या हितसंबंधाचे आणि इतर हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणारे ३ अशासकीय सदस्य यांच्या नेमणुकीबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

### राज्यात पेट्रोल आणि डिझेल या इंधनाचे दर सरकारी नियंत्रणातून मुक्त करुन बाजारातील दराशी संलग्न केल्यानंतर केरोसिनचे दरही सरकारी नियंत्रणातून मुक्त करण्याबाबत

(४६) **१०८१२** (४-८-२०१५). **श्रीमती स्मिता वाघ** : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्यात पेट्रोल आणि डिझेल या इंधनाचे दर सरकारी नियंत्रणातून मुक्त करुन बाजारातील दराशी संलग्न केल्यानंतर केरोसिनचे दरही सरकारी नियंत्रणातून मुक्त करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील प्रस्तावाबाबत शासनाने अंतिम निर्णय घेतला आहे काय, असल्यास त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ;

(३) अद्याप अंतिम निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट** (३-९-२०१५) : (१) केरोसिनचे दर निश्चित करण्याची बाब केंद्र शासनाशी संबंधित आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दिनदयाळ उपाध्यक्ष ग्रामीण ज्योती योजने अंतर्गत राज्याला ऊर्जा विकासासाठी निधी मिळण्याच्या प्रस्तावाबाबत

(४७) **१०८१५** (३-८-२०१५). **श्रीमती स्मिता वाघ** : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) दिनदयाळ उपाध्यक्ष ग्रामीण ज्योती योजने अंतर्गत राज्याला उर्जा विकासासाठी सुमारे ३ हजार कोटी रुपये मिळणेबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, निधी शासनाला प्राप्त झाला आहे काय ;

(३) असल्यास, या निधीचे वाटप केव्हा करण्यात येणार आहे ;

(४) यापैकी किती निधी उत्तर महाराष्ट्र व विदर्भाला देण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** (१४-१०-२०१५) : (१) संबंधित योजनेचे नाव दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना असून सदर योजने अंतर्गत रु. २७५९.२८ कोटीचा प्रस्ताव केंद्रशासनास सादर करण्यात आला आहे.

(२) अद्याप नाही.

(३) केंद्र शासनाने सदर प्रस्तावास मंजुरी देऊन निधी वितरीत केल्यास त्याचे वाटप करण्यात येईल.

(४) यापैकी उत्तर महाराष्ट्रासाठी रु. ३०४.५९ कोटी व विदर्भासाठी ९३७.०० कोटी निधी प्रस्तावित आहे.

---

**राज्यात फार्मासिस्ट शिवाय बोगस औषधांची मोठ्याप्रमाणावर विक्री होत असल्याबाबत**

(४८) **३७७९१** (३-५-२०१३). **श्री. संजय दत्त** : सन्माननीय अन्न व औषध प्रशासन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) राज्यात फार्मासिस्टशिवाय बोगस औषधाची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०१३ च्या दुस-यास आठवड्यात उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, शासनाकडून याची चौकशी करण्यात आली आहे काय ;

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने आतापर्यंत किती बोगस फार्मासिस्टवर शासनाने कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ;

(४) असल्यास, फार्मासिस्टशिवाय औषध विक्री करणा-या संबंधितांवर कारवाई करणेबाबत तसेच फार्मासिस्टशिवाय औषध विक्री करु नये याकरीता कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ;

(५) नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष बापट** (३-१०-२०१५) : (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यात रजिस्टर्ड फार्मासिस्ट शिवाय औषधांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असल्याचे उघडकीस आल्याची बाब खरी आहे. तथापि फार्मसिस्टशिवाय बोगस औषधाची विक्री होत असल्याचे आढळून आलेले नाही.

(२) होय.

(३) सन २०१२-१३ मध्ये अन्न व औषध प्रशासनामार्फत एकूण ३८१६० औषध विक्री परवानाधारकांच्या तपासण्या करण्यात आल्या असून ब-याचशा औषध विक्री पेढ्यांकडे रजिस्टर्ड फार्मासिस्टच्या गैरहजेरीत अनुसूची औषधांची विक्री चालु असल्याचे आढळले. दोषी असलेल्या संबधित औषधी पेढ्यांवर औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतूदीनूसार परवाना बंद किंवा निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) रजिस्टर्ड फार्मासिस्टच्या उपस्थितीत औषधांची विक्री होते किंवा कसे याची पडताळणी करण्यासाठी औषध विक्रेत्यांची नियमित तपासणी अन्न व औषध प्रशासनामार्फत केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## वर्धा उप प्रादेशिक विभागाने पकडलेले ३ ओव्हरलोडेड ट्रक सेवाग्राम पोलीस स्टेशनने दंड न स्वीकारता सोडून दिल्याबाबत

(४९) **४०७०५** (१०-५-२०१३). **श्री. मितेश भांगडिया** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम पोलीस स्टेशन ने दंडाची रक्कम वसुल न करता ३ ओव्हरलोड ट्रक सोडल्याचे वृत्त दिनांक १९ जानेवारी, २०१३ रोजी प्रकाशित झाले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर ट्रक वर्धा उप प्रादेशिक परिवहन विभागाने ओव्हरलोड ट्रकवर धाड टाकून २ लक्ष १२ हजार रुपयांचा दंड आकारुन सेवाग्राम पोलीस स्टेशनच्या हद्दीत निगराणी करीता ठेवलेले होते, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, दंड झालेल्या ट्रकच्या केवळ कागदपत्रांची तपासणी करुन दंड रक्कम जमा केल्याची पावती न बघता तसेच वर्धा उप प्रादेशिक परिवहन विभागाला न कळविता सोडून दिले, हेही खरे आहे काय ;

(४) असल्यास, सेवाग्राम पोलीस स्टेशनने तीनही ओव्हरलोड ट्रकची दंड रक्कम बुडविल्या प्रकरणी सेवाग्राम पोलीस स्टेशनच्या ठाणेदारांवर कारवाई करण्यात आलेली आहे काय ;

(५) नसल्यास, कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (२१-८-२०१५) : (१) वर्धा जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध होणा-या स्थानिक वर्तमानपत्रात सदर बातमी प्रकाशित झाल्याचे आढळून आले नाही.

(२) होय.

(३) नाही, याबाबत श्री. सरबजीतसींग मुलतानी यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर येथील सदर ट्रक सोडण्याचे आदेश व दंड भरल्याच्या तीन पावत्यांची साक्षांकित प्रत पो.स्टे. सेवाग्राम येथे सादर केल्याने तिन्ही ट्रक दिनांक १९ डिसेंबर, २०१२ रोजी त्यांच्या ताब्यात देण्यात आले. तसेच सदर ट्रक सोडल्याची माहिती पो.स्टे. सेवाग्राम येथील जा.क्र.४७०२/१२, दिनांक २० डिसेंबर, २०१२ अन्वये प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर यांना पत्राद्वारे देण्यात आली आहे.

(४) व (५) पोलीस स्टेशन सेवाग्राम येथील सदर तिन्ही ट्रक सोडविण्याकरिता प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूरचे खोटे दस्तऐवज तसेच दंड आकारणीची बनावट पावत्यांच्या आधारे शासनाचा रु. २,२४,६०० चा महसूल चुकवून फसवणूक केल्याबाबतची लेखी तक्रार प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक यांनी दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१३ रोजी दिल्यावरुन सदर ट्रक मालक व चालक असे एकूण ६ आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन सेवाग्राम येथे अप.क्र.२४/२०१३, भा.दं.वि. कलम ४६८, ४७१, ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर असल्याने ठाणेदार, सेवाग्राम यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही.

**मौजे कुची (ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली) येथील जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधण्यास मंजूरी मिळण्याबाबत**

(५०) **५१९३३** (२८-७-२०१५). **श्री. शरद रणपिसे** : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) मौजे कुची (ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली) येथील मागासवर्गीय जनतेसाठी मागासवर्गीयांनी दिलेल्या भुखंडावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधण्याकरीता निधी मंजुर करण्याकरीता संबंधित मा. मंत्री व संबंधित विभागाने आश्वासन देण्यात येवूनही अद्यापी निधी मंजूर करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जून, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधण्याकरीता निधी मंजूर करण्याकरीता शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले** (१५-५-२०१५) : (१) व (२) मौजे कुची (ता. कवठेमहंकाळ, जि.सांगली) येथे सांस्कृतिक भवन इमारत बांधकामासाठी आर्थिक मदत मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. तथापि स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने (लेखाशीर्ष २२२५ ३६३६) मंजूर करण्याबाबतची नियमावली निश्चित करण्याची कार्यवाही अंतिम झाल्यानंतर याबाबतच्या प्रस्तावांवर निर्णय घेण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

विधान भवन :
नागपूर.

शामुना–एचबी-२१०९–मविसना–११-२०१५–४६० प्रती–पीआर-८*